लोकन्यायालय

लोकन्यायालय म्हणजे काय?

वाद उद्‌भवला तर तो शक्यतोवर सामंजस्याने सोडवावा ही आपली प्राचीन परंपरा, गावातील जुनी-जाणती माणसे एकत्र येत आणि कोणाही मध्ये उद्‌भवलेला कुठल्याही स्वरुपाचा वाद समजुतीने मिटवित. ज्यांच्यापुढे वाद नेला जाई ते त्या गावातील आदरणीय आणि नि:पक्षपाती लोक असत. यालाच 'गाव पंचायत' असे म्हणत. सध्याचे 'लोकन्यायालय' म्हणजे या गाव पंचायतीचेच आधुनिक रुप. जेथे कायदा जाणणाऱ्या नि:पक्षपाती लोकांचे न्यायमंडळ त्यांच्यापुढे येणाऱ्या प्रकरणांमध्ये सामंजस्याने न्याय्य तडजोड घडविते.

लोकन्यायालये कोठे भरविली जातात?

लोकन्यायालये राज्यातील सर्व न्यायालयांमध्ये नियमितपणे भरविली जातात. प्रत्येक जिल्ह्याच्या वा तालुक्याच्या ठिकाणी दोन महिन्यातून किमान एकदा व आवश्यकता भासल्यास त्याहून अधिक वेळा योग्य त्या सूचना देऊन त्या त्या न्यायालयामध्ये लोकन्यायालयाचे आयोजन केले जाते. जिल्ह्याच्या ठिकाणी लोकन्यायालये जिल्हा न्यायालयात तर तालुक्याच्या ठिकाणी होणारी लोकन्यायालये तालुका कोर्ट परिसरात भरविली जातात. उच्च न्यायालयामध्ये मुंबई येथे तसेच नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठाचे ठिकाणी देखील न्यायालये भरविली जातात.

लोकन्यायालयाचे आयोजन कोण करते?

लोकन्यायालयाचे आयोजन विधी सेवा प्राधिकरणांमार्फत केले जाते. राज्य व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणे, तालुका विधी सेवा समित्या व उच्च न्यायालय विधी सेवा समिती यादवारा विधी सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७ मधील तरतूदी अंतर्गत लोकन्यायालयाचे वेळोवेळी आयोजन केले जाते. लोक न्यायालयाची तारीख सामान्यत: एक महिना अगोदर जाहीर केली जाते.

लोकन्यायालयांची रचना कशी असते?

लोकन्यायालय देखील एकाअर्थी कोर्टच असते. उलटपक्षी कोर्टात जेथे तुमच्या खटल्याच्या निवाड्यासाठी एकच न्यायाधीश असतात तेथे लोकन्यायालयात किमान तीन जाणकार व्यक्तींचे पॅनेल न्यायाधीशांची भूमिका बजावते. कार्यरत अथवा निवृत्त ज्येष्ठ न्यायाधीश पॅनेलचे प्रमुख म्हणून तर अनुभवी वकील अथवा कायद्याच्या जाणकार व्यक्ती सदस्य म्हणून लोकन्यायालयाचे काम पहातात.

लोकन्यायालयापुढे कुठले खटले येतात?

लोकन्यायालयामध्ये दिवाणी व फौजदारी दोन्ही स्वरुपाची प्रकरणे समेटासाठी येऊ शकतात. मोटार अपघात व भूसंपादन नुकसान भरपाईचे दावे, बँका व अन्य वित्तीय संस्थांचे वसुलीचे दावे, वैवाहिक संबंधातील वाद, निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम १३८ खाली दाखल झालेली प्रकरणे वगैरेंसाठी स्वतंत्ररित्या खास लोकन्यायालये आयोजित केली जातात. वरील प्रकरणात मोडणारी न्यायालयात प्रलंबित असणारी प्रकरणे तर लोकन्यायालयात घेता येतातच शिवाय कोर्टात दाखल न झालेली प्रकरणे देखील (Pre-Litigation) लोकन्यायालयापुढे समेटासाठी येऊ शकतात व त्याबाबत देखील लोकन्यायालयात निवाडा होऊ शकतो. म्हणजेच तुमचा वाद कोर्टात प्रकरण दाखल करण्याअगोदर देखील लोकन्यायालयासमोर नेऊन त्याचा निवाडा करुन घेऊ शकता.

लोकन्यायालयासमोर दावा कसा येऊ शकेल?

ज्या न्यायालयात आपला खटला प्रलंबित आहे तेथे एक साधा अर्ज देऊन केसच्या कुठल्याही टप्प्यावर आपण आपला खटला लोकन्यायालयापुढे नेऊ शकतो. असा अर्ज आल्यावर न्यायाधीश दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतात व दाव्यातील वाद आपसात समजूतीने मिटू शकेल असे मत झाल्यास प्रकरण लोकन्यायालयापुढे ठेवण्याचा आदेश करतात. दावा व कैफियतीतील कथनावरुन संबंधित न्यायाधीशांना प्रकरणाची आपसात समजूतीने मिटण्याची शक्यता वाटली तर कुठल्याही पक्षाचा अर्ज नसला तरी न्यायाधीश स्वत:हून खटला लोकन्यायालयाकडे वर्ग करु शकतात.

लोकन्यायालयाच्या निवाड्याची अंमलबजावणी कशी होते?


लोकन्यायालयात होणारा निवाडा म्हणजे कोर्टाचा पक्का हुकूमनामाच. लोकन्यायालयापुढे पक्षकार जी आपसात समजूत करतात किंवा आपसात समजूतीचा जो मसूदा तयार करतात. त्याचेच रुपांतर लोकन्यायालयाच्या निवाड्यात होते. कोर्टाच्या हुकूमनाम्याची व्हावी तशीच अंमलबजावणी लोकन्यायालयात झालेल्या निवाड्याची करता येते आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे लोकन्यायालयात होणारा निवाडा हा अंतिम असतो. त्याविरुध्द अपील करता येत नाही.

लोकन्यायालयात समेट झाला नाही तर काय?

समजा काही कारणास्तव तुमचा वाद लोकन्यायालयात मिटू शकला नाही तर तुमचा दावा संबंधित कोर्टाकडे परत जातो व प्रचलित न्याय पध्दतीप्रमाणे दाव्यासंदर्भातील दरम्यानचे काळात तात्पुरती थांबलेली कारवाई पुढे सुरु होते. दावा कोर्टात दाखल करण्यापूर्वी लोकन्यायालयात आणला असेल (Pre-Litigation) व त्याचा निवाडा होऊ शकला नाही तर कोर्टात केस दाखल करण्याचा मार्ग मोकळा राहतोच. लोकन्यायालयासमोर तुम्ही काही तडजोडीचा प्रस्ताव दिला असला तरी तो मूळ केसच्या रेकॉर्डवर कुठेही येत नाही व दाव्याच्या गुणवत्तेच्या आधारे निकाली होण्याच्या प्रक्रियेवर त्याचा काहीही अनुकूल अथवा विपरीत परिणाम होत नाही. सारांश - लोकन्यायालयापुढे येण्यात नुकसान काहीच नाही.

लोकन्यायालयाचे फायदे -

१) केसचा झटपट निकाल लागतो. तोंडी पुरावा - उलटतपासणी-दीर्घ युक्तिवाद या बाबी टाळल्या जातात.
२) लोकन्यायालयाच्या निवाड्याविरुध्द अपील नाही. एकाच निर्णयात कोर्टबाजीतून कायमची सुटका होते.
३) लोकन्यायालयात होणारा निवाडा हा आपसात समजूतीने होत असल्याने ना कोणाचा जय होतो ना कोणाची हार.
४) लोकन्यायालयाचा निवाडा दोन्ही पक्षांना समाधान देतो.
५) परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकमेकातील द्‌वेष वाढत नाही व कटूताही निर्माण होत नाही.
६) कोर्टाच्या हुकूमनाम्याप्रमाणेच लोकन्यायालयात होणाऱ्या निवाड्याची अंमलबजावणी कोर्टामार्फत करता येते.
७) वेळ आणि पैसा दोघांचीही बचत होते.
८) लोकन्यायालयात निकाली निघणाऱ्या प्रकरणांमध्ये कायद्यानुसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते.



न्याय सब के लिए
ACCESS TO JUSTICE FOR ALL

कोल्हापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण

जिल्हा न्यायालय आवार, रुम नं. १६ व १७, २ रा मजला,
क।। बावडा, कोल्हापूर ४१६ ००६. दूरध्वनी : (०२३१) २५४१२९५.
ई-मेल : dlsa.dc.klp@gmail.com

सत्यमेव जयते